पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/४/कावि/ ६८२ / २०१२
दिनांक : ०३ / ०५ / २०१२

प्रति,
मा...................................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक ०७ / ०५ / २०१२ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा सोमवार दिनांक - ०७ / ०५ / २०१२ रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : १) सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा. विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक : २

दिनांक : ०७ / ०५ / २०१२ वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा सोमवार, दिनांक - ०७ /०५ / २०१२ रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ०६ / ०१ / २०१२, व ०२ / ०३ / २०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १२ ) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक १६ / ०४ / २०१२ रोजी झालेल्या पहिल्या सभेचा ( विशेष सभेचा ) (कार्यपत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्रमांक :- १) महाराष्ट्र नागरी सेवेमधील तरतूदीचा विचार करता डॉ.श्री. रोकडे पी.डी. यांची मनपामध्ये दिनांक १२/११/२०११ रोजी ४ वर्षाची प्रतिनियुक्तीवरील सेवा पूर्ण होत असल्याने डॉ.रोकडे यांचे शासन सेवेमध्ये प्रत्यावर्तन करणे आवश्यक आहे तथापि शासनाकडून पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत डॉ.रोकडे यांना मनपा सेवेमधून कार्यमुक्त न करता शासन मनपासाठी पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देईल त्या कालावधीपर्यंत डॉ.रोकडे यांना मान्यता व उर्वरित वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनवणे व डॉ.मदने यांना दिनांक २५/०८/२०११ पासून पुढे १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक ०७/०५/२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक :- २) प्रस्तावा सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ प्रमाणे निवडणूक प्रभागांप्रमाणे सलगता विचारात घेवून अ, ब, क, ड प्रभागांमध्ये समाविष्ठ करावयाचे निवडणूक प्रभागाचे निश्चिती करण करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे...

विषय क्रमाक :- ३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २००१ चे अनुसूची १ व २ मधील दर समानिकरणाकामी प्रस्तावा सोबत प्रपत्र अ जोडले असून यास नागरिकांच्या हरकती सुचना मागविणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती मार्फत मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे....

विषय क्रमाक :- ४) नविन दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी प्रस्तावा सोबत सादर केलेल्या परिशिष्ठाप्रमाणे आवश्यक अशी पदे निर्माण करण्यास मान्यता देणेकामी मा. स्थायी समिति मार्फत मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे...

विषय क्रमांक :- ५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभागात वृक्षारोपणा साठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणेकामी र.रु.२४,८८,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ६) सन २०१२ - १३ चे अंदाजपत्रकात नमुद केलेल्या रक्कम रु. ५०,००,०००/- पर्यंतच्या प्रस्तावा सोबतच्या यादीतील ( प्रपत्र - अ) कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत व र.रु.५० लाखावरील प्रस्तावा सोबतच्या यादीतील ( प्रपत्र - ब) कामांना प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ७) प्रस्तावात नमुद प्रमाणे सहाय्यक आयुक्त अभिनामाचे पदाची अर्हता निश्चित करणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/४/कावि/ ६८२ / २०१२
दिनांक : ०३ / ०५ / २०१२ चे लगत

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.